जिल्हा आणि तालुका पातळीवर कंत्राटी कर्मचारी
नेमणूक करण्यासाठी मार्गदर्शक सूचना

**महाराष्ट्र शासन**
नियोजन (रोहयो) विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक: आस्थाप-२०१७/प्र.क्र. ६७ /मग्रारो-३,
नवीन प्रशासन भवन, १६ वा मजला,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ९ मे, २०१७

**वाचा:** १. शासन परिपत्रक नियोजन विभाग (रोहयो) क्रमांक मग्रारोहयो-२०१०/प्र.क्र.७/रोहयो-१०अ, दिनांक १६.१०.२०१०
५. शासन निर्णय नियोजन विभाग (रोहयो) क्रमांक MGNREGA २०११/प्र.क्र.१३/रोहये१४, दिनांक १०.१०.२०११
६. शासन निर्णय नियोजन विभाग (रोहयो) क्रमांक: कंत्राटी-२०१२/प्र.क्र.२७/मग्रारो-३, दिनांक २१.०८.२०१२
७. शासन परिपत्रक नियोजन विभाग (रोहयो) क्रमांक: आस्थाप-२०१३/प्र.क्र.४/मग्रारो-३, दिनांक ११.०२.२०१३

<u>शासन परिपत्रक</u>:-

राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणीसाठी क्षेत्रिय स्तरावर कंत्राटी पध्दतीने कर्मचा-यांच्या नेमणूका करण्यात येतात. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नेमणूका प्रत्येक वर्षात निर्माण झालेल्या मनुष्य दिवसांच्या आधारे करण्यात येतात. त्यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना शासनाच्या दिनांक ११.०२.२०१३ च्या परित्रकान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

- वाचा येथील अनुक्रमांक ४ येथे नमूद दिनांक ११.०२.२०१३ च्या परिपत्रका सोबतच्या **"परिशिष्ट-अ"** तक्त्यामध्ये निर्मित मनुष्य दिवसाच्या आधारावर नियुक्त करावयाच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या पदांची संख्या ठरवून देण्यात आली आहे. या संदर्भात असे निदर्शनास आले आहे की, नरेगाची ८०% कामे प्रामुख्याने ग्राम पंचायत ही कार्यालयीन यंत्रणा असल्याने पंचायत समिती /जिल्हा परिषद यांचेमार्फत घेण्यात येतात. २०% कामे यंत्रणेच्या माध्यमातून घेण्यात येतात. अशी वस्तुस्थिती असल्याने दिनांक ११.०२.२०१३ च्या शासन परिपत्रकाचे प्रपत्र "अ" मध्ये नमूद पदांचे विभाजन तहसिल व पंचायत समिती कार्यालयांना सोबत जोडलेल्या **"प्रपत्र -१"** प्रमाणे करण्यात यावे.
- **उदा. एखादया जिल्हयात ८ लक्ष मनुष्य दिवस वर्षात निर्माण झाल्यास दिनांक ११.०२.२०१३ च्या परिपत्रकानुसार कार्यक्रम व्यवस्थापकाचे १ पद , सहायक कार्यक्रम अधिकारी यांची ४ पदे, तांत्रिक अधिकारी यांची ९ पदे व लिपिक तथा डेटा एन्ट्री ऑपरेटर यांची ४ पदे नियुक्त करणे आवश्यक आहे. निर्मित ८ लक्ष मनुष्य दिवसापैकी ६**

लक्ष मनुष्यदिवस ग्राम पंचायत / पंचायत समिती / जिल्हा परिषद येथे निर्माण झाले असतील तर सहायक कार्यक्रम अधिकारी यांची ३ पदे, तांत्रिक अधिकारी यांची ७ पदे व लिपिक तथा डेटा एन्ट्री ऑपरेटर यांची ३ पदे गट विकास अधिकारी यांच्या कार्यालयात राहतील.

- मनुष्यदिन निर्मितीच्या प्रमाणात आवश्यक कंत्राटी कर्मचारी नेमणूक करणे किंवा कमी करणे यांची जबाबदारी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची राहील. मनुष्यदिन निर्मितीच्या प्रमाणातच कंत्राटी कर्मचारी असल्याची खात्री उपजिल्हाधिकारी (रोहयो व उप मुख्य कार्यकारी अधिकारी नरेगा/ ग्राम पंचायत ) यांनी करावी व याची दक्षता घ्यावी. कंत्राटी कर्मचाऱ्यांवर आवश्यकतेपेक्षा जास्त खर्च ६% निधीतून होणार नाही याची खात्री उपायुक्त (रोहयो) यांनी लेखाधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालय (रोहयो शाखा) यांचेमार्फत करावी. उपायुक्त (रोहयो) यांनी विभागीय आयुक्त यांच्या मंजूरीने आवश्यकतेनुसार ६% पेक्षा जास्त खर्च होणार असल्यास शासनाकडून ३% खर्चाची सबळ कारणाव्दारे मागणी आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- महाराष्ट्र, नागपूर यांच्या मार्फत करावी.
- तालुका स्तरावर/पंचायत समिती स्तरावर कंत्राटी तत्वावर कार्यरत कर्मचाऱ्यांना पुर्ननियुक्ती/नविन नियुक्ती देताना दिनांक ११.०२.२०१३ च्या परित्रकातील सूचनांनुसार आवश्यक असणा-या कर्मचा-यांची शिफारस तहसिलदार/ गट विकास अधिकारी प्रथमत: प्रस्ताव आपल्या शिफारशीसह जिल्हाधिकारी/ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे सादर करतील.
- मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक हे आपल्या शिफारशीसह प्रस्ताव जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांचेकडे सादर करतील.
- जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक सर्व कंत्राटी कर्मचारी यांच्या नेमणूका सेतू अथवा बाहयस्थ मनुष्यबळ पुरवठादार संस्थेमार्फत करतील.
- शासन परिपत्रक दिनांक ११.०२.२०११ अन्वये निर्मित मनुष्य दिनाच्या आधारावर नियुक्त करावयाच्या पदांपेक्षा अधिक कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्यास, तसा प्रस्ताव जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक हे त्यांच्या शिफारशीसह आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र, नागपूर यांचेकडे परस्पर सादर करतील व त्यावर आयुक्त, नरेगा हे शासनाची मान्यता घेतील.
- संबंधित जिल्हयातील मनुष्यदिन निर्मितीच्या प्रमाणात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत उपलब्ध असलेल्या ६% प्रशासकीय निधीतून जिल्हयात कार्यरत सर्व कंत्राटी कर्मचारी यांचे मानधन जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक हे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र, नागपूर यांच्या दि.२४.०८.२०१४ च्या परिपत्रकातील सुचनांनुसार सेतू/बाहयस्थ मनुष्यबळ पुरावठादार संस्थे मार्फत विहीत वेळेत अदा करतील.
- वरीलप्रमाणे कंत्राटी कर्मचारी यांचे मानधनावर खर्च झाल्यावर संबंधित जिल्ह्यातील शिल्लक राहीलेल्या ६% प्रशासकीय निधीचे वाटप जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी

यांचेकडे १:२ या प्रमाणात आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र, नागपूर यांनी करावे व त्याप्रमाणे निधी वितरीत करण्यात यावा.

३. वरीलप्रमाणे सुचनांचे पालन करुन राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(प्रमोद शिंदे)
उप सचिव (रोहयो)

प्रति,

१. सचिव (रोहयो), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२. सर्व विभागीय आयुक्त,
३. आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र, आयुक्तालय, नागपूर.
४. सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक.
५. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक.
६. सर्व उप सचिव /अवर सचिव/कार्यासन अधिकारी, नियोजन विभाग (रोहयो), मंत्रालय, मुंबई

Y:\कंत्राटी\२०१७\परिपत्रक .docx

**प्रपत्र "१" (निर्मित मनुष्य दिवसांच्या आधारावर नियुक्त करावयाच्या पदांची संख्या)**

## Annexure '१'

| गट / स्तर (निर्माण झालेल्या मनुष्य दिवसां नुसार) | मागील वर्षात (तहसिलसह) मध्ये निर्माण झालेले मनुष्यदिवस (लाखांत) | कार्यक्रम व्यवस्थापक | सहायक कार्यक्रम अधिकारी | | तांत्रिक अधिकारी | | लिपिक तथा डाटा एन्ट्री ऑपरेटर | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तहसिल कार्यालय / पंचायत समिती कार्यालय आवश्यकतेनुसार | तहसिल कार्यालय | ग.वि.अधिकारी. पंचायत समिती कार्यालय | तहसिल कार्यालय | ग.वि.अधिकारी. पंचायत समिती कार्यालय | तहसिल कार्यालय | ग.वि.अधिकारी. पंचायत समिती कार्यालय |
| अ | ८.०० | १ | १ | ३ | ३ | ६ | १ | ३ |
| ब | ५.०० ते ८.०० | १ | १ | २ | २ | ५ | १ | २ |
| क | ४.०० ते ५.०० | १ | १ | २ | २ | ४ | १ | २ |
| ड | २.५ ते ४.०० | १ | १ | २ | २ | ३ | १ | २ |
| इ | १.५ ते २.५ | -- | १ | १ | १ | ३ | १ | १ |
| फ | १.०० ते १.५ | -- | १ | १ | १ | २ | १ | १ |
| ग | १ लाखापेक्षा कमी | -- | १* | ० | १ | १ | १ | १ |

* १ लाखापेक्षा कमी मनुष्यदिन निर्मितीच्या तालुक्यात सहायक कार्यक्रम अधिकारी हे पद तालुका व पंचायत समिती या दोन्ही कार्यालयाचे कामकाज हाताळतील.
* तहसिल कार्यालयाने सहायक कार्यक्रम अधिकारी, तांत्रिक अधिकारी, लिपिक तथा डाटा एन्ट्री ऑपरेटर यांची सेवा आवश्यकतेनुसार कृषिविभाग, वन विभाग, सामाजिक वनीकरण यांना उपलब्ध करुन दयाव्यात